MHNS140005242025

**<u>निशाणी क्रमांक ५ खालील आदेश</u>**

**<u>हरी मालसाने व इतर वि. पुंडलिक केदारे व इतर</u>**

( **दिनांक : २७/०३/२०२६** )

वादीने सदर दावा ठराव व निरंतर ताकिदी हुकूमासाठी दाखल केला आहे. त्यामध्ये वादीने प्रतिवादींविरूध्द तात्पुरत्या स्वरूपाचा मनाई हुकूम मागितला आहे.

२. **मिळकतींचे वर्णन**

तुकडी जिल्हा नासिकपैकी पोटतुकडी ता. दिंडोरी पैकी मौजे निगडोळ शिवारातील शेतजमिन यांसी

**१अ.** गट नं.५३ यांसी क्षेत्र ०१ हे. १४ आर यांसी आकार रू. ०३.१९ पैसे.

पुर्वेस — गट नं. ५४

पश्चिमेस — गट नं. २८,२७ व १०

दक्षिणेस — गट नं. ०८

उत्तरेस — गट नं. ५२ व ५१

**१ब.** गट नं ५४ यांसी क्षेत्र ०१ हे. ११ आर यांसी आकार रू.०१.३८ पैसे यांसी चतु:सिमा

पुर्वेस — गट नं. ५५

पश्चिमेस — गट नं ५३

दक्षिणेस — गट नं. ०८

उत्तरेस — गट नं. ५१

**यापुढे वरील मिळकतींचे संक्षिप्तासाठी दावा मिळकत असा उल्लेख करण्यात येतो.**

**३.** वादीचे असे म्हणणे आहे की,दावा कलम १अ यांत नमुद केलेली शेतजमिन मिळकत वादी यांच्या वडिलोपार्जित मालकीहक्काची आहे. त्यामुळे दावा मिळकत ही वादी यांचे पूर्वज हे सुमारे ६० ते ७० वर्षांपासून कसून त्यातून पिके घेवून दरसाल उत्पन्न घेत आले होते व आहे. वादी यांनी दावा मिळकतीत द्राक्ष बागेची लागवड केलेली होती व त्यांचे ॲगल्स आजही वादींच्या मिळकतीत उभे आहेत. सदर मिळकतीत वादींशिवाय कोणाचाही हक्क हितसंबंध नाही. याउलट, प्रतिवादी क्र १ ते ५ यांची दावा कलम १ब मध्ये वर्णन केलेली शेतजमिन मिळकत आहे. सदर मिळकत भौगोलिक दृष्टया वादी यांच्या मिळकतीपेक्षा पाच फुट खोल खाली आहे. तसेच पूर्वापारपासून दोन्ही मिळकतीमध्ये असलेले बांध दोन्ही गटांच्या हद्दी खुणांचे दगड जसेच्या तसे कायम आहेत. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांच्या मिळकतीत अतिक्रमण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. असे असतांनाही प्रतिवादी यांनी १ब मधील मिळकतीच्या मोजणीकामी अर्ज दिला व त्यानुसार वादींना मोजणीच्या एक दिवस आधी म्हणेजच दि.१६.११.२०२३ रोजी नोटीस देवून लगेच दुस—या दिवशी म्हणजेच दि.१७.११.२०२३ रोजी वादी यांच्यावर दडपण आणून बेकायदेशीरपणे मोजणी करून वादी यांनी प्रतिवादीच्या क्षेत्रात ८० आर अतिक्रमण केले आहे असे दर्शविण्यात आले. सदरची मोजणी वादी यांच्या समक्ष झाली नसल्याने ती त्यांना मान्य नव्हती म्हणून त्यांनी हरकत घेतली. अशाप्रकारे मो.रं क्र. ५१५/२०२३ नुसार बनवण्यात आलेला मोजणी नकाशा हा खोटा व बनावट आहे असे दिसून येते. अशी परिस्थिती असतांना प्रतिवादी क्र १ ते ५ यांच्या

क्षेत्रात वादी क्र १ ते ३ यांनी कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण केलेले नव्हते व नाही. प्रतिवादींच्या गट क्र ५४ पैकी ८० आर क्षेत्र अतिक्रमित म्हणून सांगितले होते ते क्षेत्र आजही गट क्र ५३ चा भाग आहे. त्या क्षेत्राचे वादी हेच कायदेशीर मालक आहे. सदरील वादींनी जरी दावा दाखल केला असता तरी दाव्याच्या अंतिम निर्णय होण्यास बराचसा कालावधी लागणार आहे. परंतु प्रतिवादी क्र १ ते ५ हे अतिक्रमण केस क्र १९/२०२४ च्या आदेशाच्या गैरफायदा घेवून वादींच्या १अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये वादींच्या कब्जात असलेल्या शांततामय कब्जा अनाधिकाराने काढून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. तसे झाल्यास वादीवर अन्याय होणार आहे. वादीच्या लाभात तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास त्याचे कधीही न भरून येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादी क्र १ ते ५ यांच्याविरूध्द मनाई हूकूम दिल्यास यांचे काहीएक नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीने प्रस्तुतच्या अर्जाद्वारे तात्पुरत्या स्वरूपाच मनाई हुकुम दाव्याचा निकाल लागेपर्यत प्रतिवादीं विरूध्द देण्याची मागणी केली आहे.

४. प्रतिवादीचे असे कथन आहे की, दावा कलम १ब मध्ये वर्णन केलेली मिळकत ही त्यांच्या मालकीची व कब्जातील आहे. सदर मिळकतीच्या पश्चिम बाजूने वादीची दावा कलम १अ मध्ये वर्णन केलेली मिळकत आहे. प्रतिवादी क्र १ हा नोकरीनिमित्त बाहेरगावी राहत असल्याने व गावी मिळकतीत येवून १ब मध्ये वर्णन केलेली मिळकत कसत होते. वादी यांनी प्रतिवादी हे दावा मिळकतीत राहत नसल्याचा गैरफायदा घेवून अतिक्रमण केले होते. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांच्या मालकीचा गट क्र ५४ हा पूर्ण भरत नसल्याने त्यांनी त्यांच्या गटाची उपधिक्षक भुमिअभिलेख यांच्याकडून दि.१७.११. २०२३ रोजी मोजणी करून घेतली त्यावेळी वादी व इतर लगत कब्जेदार प्रत्यक्ष हजर होते. तेव्हा वादींनी तोंडी अथवा लेखी हरकत घेतलेली नव्हती व नाही. त्यानंतर गट क्र ५४ चा मोजणी नकाशा तयार करण्यात आला व त्यात वादीने प्रतिवादीच्या क्षेत्राच्या पश्चिम बाजूने ८०आर क्षेत्र अतिक्रमित केल्याचे निष्पन्न

झाले. सदर अतिक्रमित क्षेत्राची मागणी प्रतिवादींनी वादींकडे केली मात्र, वादींनी त्यास दमदाटी करून नकार दिला. अशाप्रकारे गट क्र ५४ ची केलेली मोजणी व त्या मोजणी प्रकरणातील सर्व दस्तऐवज सार्वजनिक असून सदर नकला योग्य ,बरोबर व कायदेशीर असल्याचे गृहितके आहे. वादीकडे कोणताही सबळ पुरावा नाही त्यांनी न्यायालयापासून महत्वपूर्ण बाबी लपवुन ठेवल्या आहे. सबब वादीचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**५.** वादी व प्रतिवादीचा युक्तिवाद व दाखल दस्तऐवजांवरून पुढिल मुद्दे निघतात ते त्यावरील निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुददे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी बाजु वादींच्या पक्षात असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | .... | होकारार्थी |
| २. | अनुकुलतेचा रोख/तोल वादीचे बाजुने असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | .... | होकारार्थी |
| ३. | तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश नाकारल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | .... | होकारार्थी |
| ४. | काय आदेश? | .... | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |

## — कारणमिमांसा —

**६.** प्रस्तुतच्या अर्जाकामी वादीने निशाणी क्र. ३ लगत दावा मिळकतींचे सातबारा उतारे व फेरफार नोंद तसेच अतिक्रमण केस क्र १९/२०२४ ची न्यायनिर्णयाची प्रत दाखल केली आहे. तसेच नि.क्र ३५ च्या यादीलगत मंडल अधिकारी ननाशी यांनी वादींना पाठवलेली नोटीसची प्रत दाखल केली आहे. याउलट, प्रतिवादींनी नि.क्र ३९ च्या यादीलगत उपधिक्षक भुमिअभिलेख

दिंडोरी यांच्याकडील संपूर्ण मोजणी प्रकरण व प्रतिवादी यांनी वादींना पाठवलेल्या नोटीसचे स्थळप्रत दाखल केली आहे.

७.		तसेच वादी व प्रतिवादी यांनी मा. उच्च न्यायालयाचे काही न्यायनिवाडे दाखल केले आहे. ते न्यायनिवाडे खालीलप्रमाणे

**अ. काशिनाथ शास्त्री *वि. हरीभाउ बावनथाडे (२००४) २ एम.एच.एल.जे.* ७२४** निकाल दि.१५.१२.२००३ सदर न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालयाने एखादा नकाशा विशेषत: एखादया प्रकरणासाठी तयार केला जातो. त्यावेळी नकाशा अचूक असल्याचे सिध्द करण्याची जबाबदारी संपूर्णपणे तो करण्या—या पक्षावर आहे. म्हणजेच सदर नकाशे कायदयानुसार सिध्द होत नाही तोपर्यंत ते पुराव्यात वाचता येत नाही.

**ब. रजनी रणखांबे *वि. मुक्ताबाई पुंड रिट पिटीशन नं. १७५७/२०१६ निकाल दि.२१.०४.२०१६*** सदर न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालयाने दिवाणी न्यायालयाची अधिकार कक्षा व मुदतीच्या मुद्दयाबाबत विश्लेषण केले आहे. सदय स्थितीत सदर न्यायनिर्णय मनाई हुकूमाच्या अर्जाच्या अनुषंगाने लागू होत नाही. सबब, आदराने वरील निर्णय लागू होत नाही.

**क. रजनी रणखांबे *वि. मुक्ताबाई पुंड रिट पिटीशन नं. २८८४/२०१६ निकाल दि.२१.०४.२०१६*** सदर न्यायनिर्णयात मा. उच्च न्यायालयाने अतिक्रमण केस नं. ११/२०११ नुसार वादीकडुन ९९ आर जमिनीचा ताब घेण्यापासून प्रतिवादी विरूध्द मनाईहूकूम जिल्हा न्यायालयाने दिला होता व तो आदेश मा. उच्च न्यायालयाने कायम केला होता. कारण दावा मिळकतीत वादींचा ताबा न्यायालयाला दिसून आला होता. प्रस्तुत केसमध्ये देखिल अतिक्रमण केस क्र. १९/२०२४ नुसार वादीकडून ८० आर क्षेत्राचा ताबा प्रतिवादीस देण्याचा आदेश पारीत केला आहे. मात्र, सदर मिळकतीचा ताबा वादीकडे असल्याचे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. तसेच प्रतिवादीच्या कैफियतीत देखिल नमुद आहे.

सबब, सदर न्यायनिर्णय या प्रकरणामध्ये लागू होतो.

**ड.** याउलट, प्रतिवादीने मा. सर्वोच्च न्यायालयाचा ***रामभाउ नागपूरे वि. गणेश वारबे (२०१९)९ एस.सी.सी २०२*** *सदर न्यायानिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने* ***'महसूल अधिका—यांनी तयार केलेल्या नकांशांचे पूरावा मुल्य कायम असते असे नमूद केले आहे'***. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता नकाशाची वैध्यता किंवा पुरावा मुल्य हे सदय स्थितीत विचारात घेता येणार नाही कारण मनाईहूकूमाच्या अर्जाच्या वेळी प्रथमदर्शनी केसचा विचार होणे आवश्यक असते सबब, आदराने सदर न्यायनिर्णय या ठिकाणी लागू होत नाही.

*८.* या ठिकाणी ही बाब नमुद करणे आवश्यक आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठी असल्याने प्रथमदर्शनी केस सिध्द करणे आवश्यक असते. सबब, आदराने वरील काही न्यायनिर्णय सदयस्थितीत विचारात घेण्यात येत नाही. मात्र, **रजनी रणखांबे *वि. मुक्ताबाई पुंड रिट पिटीशन नं. २८८४/२०१६ निकाल दि.२१.०४.२०१६*** हा न्यायनिर्णय मनाई हूकूमाच्या अर्जाबाबत असल्याने तसेच सदर न्यायनिर्णयातील वस्तूस्थिती व कायदेशीर स्थिती प्रस्तुत केसच्या वस्तूस्थिती व कायदेशीर स्थितीशी सुसंगत असलयाने विचारात घेण्यात येतो.

**<u>मुद्दा कमांक १ बाबत</u> :**

९. प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती व उपलब्ध दस्तऐवजांचा विचार करीता प्रथमदर्शनी असे निदर्शनास येते की, मो.रं.नं. ५१५/२०२३ च्या नकाशामध्ये सुमारे ८०आर क्षेत्र हे वादीच्या ताब्यात व वहिवाटीत असल्याचे दिसून येते, परंतु ते प्रतिवादीचे असल्याचे दिसून येते. या ठिकाणी प्रतिवादीने युक्तीवाद केला की, मोजणी नकाशा हा सार्वजनिक दस्तऐवज असल्याने तो योग्य व बरोबर असल्याचे गृहितक आहे. याउलट, वादीने युक्तीवाद केला की, जरी नकाशा योग्य व बरोबर असल्याचे गृहितक

असले तरी तो प्रतिवादीने कायदयानुसार सिध्द करणे आवश्यक आहे. परंतु सदर नकाशा बरोबर आहे किंवा कसे हे दावाचे कामकाज गुणवत्तेवर चालल्यावर सिध्द होईल. मात्र सदर नकाशाच्या आधारे अतिक्रमण अर्ज क्र १९/२०२४ मध्ये झालेल्या निर्णयानुसार वादीचा तथाकथित कब्जा काढून घेतल्यास त्याचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. या ठिकाणी ही बाब नमुद करणे आवश्यक आहे की, प्रथमदर्शनी वादीने दावा मिळकतीवर कब्जा असल्याचे सिध्द केले आहे. तसेच प्रतिवादीने देखिल वादीचा कब्जा असल्याचे कथन केले आहे. सदर क्षेत्र वादीचे मालकीचे आहे किंवा प्रतिवादीचे मालकीचे आहे शिवाय वादीचा कब्जा कायदेशीर किंवा बेकायदेशीर आहे, हे सबळ पुराव्यानिशी सिध्द होईलच परंतु सदयस्थितीत सदरचे क्षेत्र वादीच्या ताब्यात असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सबब, वादीने प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजूने असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. सबब, **रजनी रणखांबे *वि. मुक्ताबाई पुंड रिट पिटीशन नं. २८८४/२०१६ निकाल दि.२१.०४.२०१६*** च्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u> :**

**१०.** प्रकरणातील वस्तुस्थिती, अभिलेखावर दाखल दस्ताऐवज व वादीच्या म्हणण्यांचा विचार करता असे दिसते की, तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश वादीच्या बाजूने दिल्यास तुलनात्मक दृष्टया प्रतिवादीचे होणारे नुकसान हे कमी आहे. परंतु वादीच्या बाजुने तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश दिला नाही तर वादीचे मोठया प्रमाणामध्ये नुकसान होवू शकते. कारण सदर क्षेत्रावर वादीचा कब्जा असून तो त्यात उत्पन्न घेत आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येते. याउलट, तुलनात्मक दृष्टया प्रतिवादीला फारसे नुकसान होत नाही. परिणामत; मी मुद्दा क्रमांक २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ बाबत</u> :**

**११**.      वरिल चर्चेवरून असे दिसते की, दावा मिळकत प्रथमदर्शनी वादी यांच्या कब्जात असल्याचे दिसून येते. जर वादीच्या बाजूने मनाई हुकूमाचा आदेश दिला गेला नाही तर वादीचे कधीही भरून न निघणारे नुकसान होवू शकते, ज्याची भरपाई पुरेशा प्रमाणामध्ये पैशाच्या स्वरूपात होवू शकत नाही. न्यायालयाचा अंतीम निकाल होईपर्यंत थांबल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होवू शकते. त्यामुळे न्यायालयीन हस्तक्षेप आवश्यक आहे. या निष्कर्षाप्रत मी आले आहे. परिणामत; मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. याद्वारे असा तात्पुरता मनाई हुकूम दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र. १ ते ५ विरूध्द देण्यात येत आहे की, प्रस्तुत दावा कलम १अ मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी अगर त्यांच्या मार्फत इतर कोणीही वादीच्या शांततामय कब्जास हरकत अडथळा होईल असे कोणतेही बेकायदेशीर कृत्य करू नये.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

PANDIT ASHWINI ANIL

Digitally signed by PANDIT ASHWINI ANIL
Date: 2026.03.27 16:57:16 +0530

दिनांक : २७/०३/२०२६

( अ.अ.पंडित )
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
दिंडोरी, (MH03260)